दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक १८१ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.२६ सप्टेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# पंतप्रधान यांच्यामुळे देशाला विकासाची दिशा : केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**काँग्रेसच्या काळात योजना बारगळायाच्या तर मोदी सरकारमुळे तळागाळातील लोकांपर्यंत योजना पोहोचल्या असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे देशाला विकासाची दिशा मिळाली आहे, असे प्रतिपादन केंद्रीय पर्यावरण, कामगार व वने मंत्री तथा भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस भूपेंद्र यादव यांनी केले.**



सेवा व समर्पण अभियान अंतर्गत पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंतीनिमित्त रायगड जिल्हा भाजपच्या वतीने खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते प्रमुख मान्यवर म्हणून बोलत होते. या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य विधानसभेचे विरोधी पक्षनेते माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सेवा व समर्पण महाराष्ट्र राज्य प्रमुख माजी आमदार राज के. पुरोहित, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, रायगड जिल्हा संपर्क प्रमुख आमदार योगेश सागर, आमदार रवीशेठ पाटील, महापौर डॉ. कविता चौतमोल, प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाळासाहेब पाटील, संजय उपाध्याय, दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष महेश मोहिते, उरणच्या नगराध्यक्षा सायली म्हात्रे, पेणच्या नगराध्यक्षा प्रितम पाटील,ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, पनवेल तालुका मंडल अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहराध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, विनोद साबळे, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा आश्विनी पाटील, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, दिनेश खानावकर, यांच्यासह जिल्हातील पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाला स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, शक्ती केंद्र, बूथ अध्यक्ष आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते दिव्यांगांना मदत, तसेच कुष्ठरुग्णांना धान्यवाटप, स्वच्छ भारत निर्मल भारत अंतर्गत शौचालय लाभार्थी, किसान सन्मान योजना, उज्वला गॅस योजना लाभार्थींचा सन्मान करण्यात आला. तसेच कोरोनामुळे अनाथ झालेल्या विद्यार्थ्यांना श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून प्रत्येकी पाच हजार रुपयांची मदत त्याचबरोबर या विद्यार्थ्यांचा दहावी पर्यत शिक्षणाची जबाबदारी मंडळाच्या माध्यमातून घेण्यात आली. त्या मदतीचे वाटप यावेळी करण्यात आली.

नामदार भूपेंद्र यादव यांनी पुढे म्हंटले कि, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजकारणाला दिशा देत त्याचे रूपांतर जनसेवेत केले आहे. पंतप्रधान नाही तर प्रधानसेवक म्हणून त्यांनी देशाची जबाबदारी स्विकारली आणि ते सर्वसामान्य नागरिकाचा विकास हा ध्यास घेऊन जबाबदारी यशस्वीपणे पार पाडत आहेत. २०१४ ला त्यांनी देशाचा कारभार हाती घेतला त्यावेळी भ्रष्टाचाराचा समूळ नायनाट करण्याचा निर्धार केला, विविध योजना राबवित असताना त्यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या अंत्योदयचा विचार रुजवला. त्यामुळे तळागाळातील सर्व लाभार्थींना १०० टक्के लाभ मिळत आहे. पुन्हा एकदा २०१९ मध्ये मोदी यांना जनतेचा आशिर्वाद मिळाला आणि त्या आशिर्वादाने ते जनतेच्या सेवेसाठी अहोरात्र काम करीत आहेत. जगात कोरोनाचे संकट आले पण आपल्या पंतप्रधानांनी वेळेवर व योग्य निर्णय घेत आवश्यक उपाययोजना केली. दुसरे सरकार असते तर कोरोनाची लढाई जिंकू शकला नसता कारण देशाच्या आणि नागरिकांच्या विकासाची जबाबदारी त्यांना पेलवली नसती, असेही त्यांनी यावेळी नमूद केले. राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारने शेतकरी, उद्योग, गरिबांचे काम केले. अनेक योजना प्रभावीपणे अंमलात आणल्या त्यामुळे फडणवीस यांचा कार्यकाळ महाराष्ट्राच्या इतिहासातील सुवर्णकाळ होता, असे सांगतानाच महाराष्ट्राच्या पुढच्या निवडणुकीत भाजपचे सर्व आमदार भरघोस मतांनी निवडून येतील, असे सूतोवाचही त्यांनी केले.



यावेळी त्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्याचा गौरवही केला. रामशेठ ठाकूर यांच्या कडून लोकांची प्रदीर्घ काळापासून सेवा केली जात असून त्यांनी कोरोनाच्या काळात केलेल्या मदतीला तोड नसल्याचेही आपल्या भाषणातून अधोरेखित केले. आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी या विभागाचे सक्षम नेतृत्व असल्याचे सांगत या दोन्ही आमदारांनी पेण मूर्तिकार, माथेरान, पनवेल रेल्वे स्थानक, कर्नाळा अभयारण्य अशा विविध केलेल्या मागण्या व सूचनांना न्याय देणार असल्याचे सांगितले.

यावेळी माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हंटले कि, प्रशांतजी आणि महेशजी मिळून एक नवीनच रसायन तयार होते. पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांचे कौतुक करताना सांगितले कि, एक अतिशय शांत आहे तर दुसर्याला शांत करावे लागते. पनवेल उरणच्या विकासाच्या दृष्टिकोनातून त्यांनी या दोघांनी प्रकल्पे मंजूर करून घेतले आहेत. मला माहिती आहे त्यांनी ठरवले आहे तर ते काहीही करू शकतात कारण याच्या मागण्या रास्त आणि पाठपुरावा सातत्यपूर्ण असतो. आता दोघे मिळून भूपेंद्रजींच्या मागे लागून महिना भरात बैठक लावून त्या पूर्ण करून घेतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कोरोना काळात पदरचे पाच कोटी रुपयांचे अन्नधान्य गोरगरीब गरजूंना वाटप केले असून ते खऱ्या अर्थाने गरिबांचे कैवारी आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. मोदीजी आपला वाढदिवस साजरा करू देत नाहीत मात्र पक्ष लोकोपयोगी उपक्रम राबवून अखंडपणे सेवेचा व्रत सुरूच ठेवतात. मोदींनी कार्यसंस्कृती आणली त्यामुळे कोरोना असो, लस असो, योजना, विकासकाम असो देशातील प्रत्येक नागरिकाला न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जात आहे. महाराष्ट राज्य लसीकरणात एक नंबर आहे याचा आम्हा सर्वांना अभिमान आहे, मात्र केंद्राने लस मोफत आणि कोणतेही राजकारण न करता जास्त संख्येत दिली याचा विसर राज्य सरकारला पडला असल्याची टीकाही त्यांनी केली. कोरोना काळात सर्वात जास्त मदत भाजपने केली, त्यामुळे आम्ही टीकेने नाही तर कृतीने उत्तर देतो, असेही खणखणीत आवाजात सांगितले. भाजप जनसेवा करणारा पक्ष आहे त्यामुळे शेवटच्या माणसापर्यंत त्याचा अधिकार देण्यासाठी कटिबद्ध आहोत असे सांगतानाच या कार्यक्रमाच्या अनुषंगाने त्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर, तिन्ही आमदार आणि टीमचे अभिनंदन केले. यावेळी प्रास्ताविकपर भाषणात आमदार प्रशांत ठाकूर यांनी कोरोना तसेच महापूर, वादळ अशा संकटात भाजपच्यावतीने केलेल्या कार्याचा आढावा विशद केला.

## मूर्तिकारांना मोठा दिलासा

गणेशोत्सवात मंडळांसाठी मोठ्या मुर्ती बनवताना प्लास्टर ऑफ पॅरिसचा वापर करावा लागतो. त्यावर बंदी आणल्याने रायगड जिल्ह्यातील पेणच्या गणेश मुर्ती बनवणार्या कलाकारांचे मोठ्या प्रमाणात अर्थीक नुकसान होत आहे. प्रत्यक्षात गणेशमुर्तीमूळे पर्यावरणावर परिणाम होत नाही तर त्या रंगवण्यासाठी वापरल्या जाणार्या रंगामुळे प्रदूषण होते. त्यामुळे पर्यावरण खाते सांगेल ते रंग आम्ही वापरण्यास तयार आहोत. त्यामुळे प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींना परवानगी देण्याची मागणी आमदार महेश बालदी यांनी यावेळी केली. त्याबाबत केंद्रीय पर्यावरण व वने मंत्री भुपेंद्र यादव यांनी आमच्या केंद्र सरकारच्या अखत्यारीतील जे नियम आहेत त्याबाबत चर्चा करण्यासाठी तुम्ही या तुमचे स्वागत होईल आणि निश्चित त्यातून मार्ग काढला जाईल असे सांगून मूर्तिकारांना मोठा दिलासा दिला.

## संक्षिप्त...

### ईडीची नोटीस पाठविणे ही आजची फॅशनच : खा. सुप्रिया सुळे

**बुलडाणा : वृत्तसंस्था**

भाजप किंवा केंद्र सरकारच्या विरोधात बोलल्यास लगेच ईडीची नोटीस येण्याचे प्रकार वाढले आहे. एक प्रकारे पोस्टकार्डप्रमाणे त्या मिळत आहेत, या देशात ईडीची नोटीस पाठविणे ही एक फॅशन झाल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसच्या खा. सुप्रिया सुळे यांनी बुलडाणा येथे स्पष्ट केले.

बुलडाणा येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या शिलेदार निष्ठेचे या कार्यक्रमानिमित्त त्या आल्या होत्या. त्यावेळी निवडक प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलतांना त्यांनी शनिवारी उपरोक्त विधान केले. ईडीकडून महाविकास आघाडीतील अनेक मंत्र्यांना नोटीस पाठविण्यात येत आहे. भाजपाचे नेते किरीट सोमय्याही मध्यंतरी ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांच्यावरही आरोप केले होते. त्यासंदर्भाने सुळे यांना विचारणा केली असता त्यांनी उपरोक्त विधान केले. भाजप किंवा केंद्र सरकारच्या विरोधात बोलणाऱ्यांना अलिकडील काळात ईडीकडून नोटीस दिल्या जात आहे. पोस्टकार्डप्रमाणेच त्या आजकाल मिळत असल्याने या नोटीस पाठविण्याची एक फॅशनच भारतात झाल्याचे त्या म्हणाले. किरीट सोमय्यांचा महाविकास आघाडी विरोधात भाजप वापर करते आहे का? या बाबत विचारणा केली असता या मुद्द्यावर आपण बोलणार नाही.

## वाहतूक कोंडी फोडण्यासाठी पनवेल वाहतूक शाखेचे प्रयत्न

# उरण नाका ते टपाल नाका मार्ग होणार एक दिशा मार्ग

### सोमवारपासून सुरू होणार कडक अंमलबजावणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर व आजूबाजूच्या परिसराचा झपाट्याने विकास होत असून लोकसंख्येतही प्रचंड वाढ झालेली आहे. त्याचाच परिणाम वाहनांच्या संख्येतही झाला असून पनवेलमधील नागरिक वाहतूक कोंडीने प्रचंड त्रस्त झाले आहेत. त्या दृष्टीने उपाय योजना करण्यासाठी पनवेल वाहतूक शाखेतर्फे प्रयत्न सुरु असून सोमवार २७ सप्टेंबरपासून उरण नाक्याकडून टपाल नाक्याकडे येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात आलेली आहे.



पनवेलमधील उरण नाका, टपाल नाका परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. उरण नाका ते टपाल नाका परिसरात मच्छिमार्केट तसेच अन्नधान्याची मोठी व्यापारी दुकाने असून संपूर्ण तालुक्यातून तसेच ग्रामीण भागातून येणाऱ्याा नागरिकांचा मोठा रेटा या परिसरात असतो. त्यामुळे येथे सतत वाहतूक कोंडी होत असते. या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना दररोज प्रचंड नाहक त्रास होत आहे. ते रोखण्यासाठी तसेच पनवेलमधील वाहतुकीमुध्ये सुसूत्रता आणण्याचे प्रयत्न वाहतूक शाखेतर्फे सुरू असून त्याचाच एक भाग म्हणून टपाल नाका ते उरण नाका हा मार्ग एक दिशा मार्ग करून उरण नाक्याकडून टपालनाक्याकडे येणाऱ्या सर्व वाहनांना प्रवेशबंदी करण्यात आली आहे. फक्त दुचाकींना यामध्ये सुट देण्यात आली आहे. तसेच पंचरत्न चौक, मोमीनपाडा मस्जिद मार्गे ते टपाल नाका या मार्गावर सोमवारपासून सम विषम पार्कींगची कडक अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीचे प्रमाण काही अंशी कमी होवून नागरिकांना दिलासा मिळू शकेल.

प्रायोगिक तत्वावर पंचरत्न चौक, मोमीनपाडा मार्गे टपाल नाका या एकाच मार्गावर सम विषम पार्कींग सुरू करत असून हळुहळू संपूर्ण पनवेलमध्ये वाहतूक व्यवस्थेमध्ये सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न राहील. तरी नागरिकांनी दररोज होणाऱ्या वाहतूक कोंडीसाठी नव्याने करण्यात आलेल्या नियमांचे पालन करून पनवेल वाहतूक शाखेला सहकार्य करावे.

**संजय नाळे, वरिष्ठ वाहतूक पोलीस निरीक्षक, पनवेल**

## श्रीवर्धनमधील रस्त्यांची दुर्दशा ; चार प्रमुख मार्गावर खड्डेच खड्डे

**दै.रायगड नगरी । गणेश प्रभाळे**

**दिघी** : दिघी – श्रीवर्धन तालुक्यातील अंतर्गत रस्त्यांसह प्रमुख मार्ग खड्डेमय बनले आहेत. येथे पावसामुळे रस्त्यांच्या दुरवस्थेत वाढ झाली आहे. त्यामुळे वाहनधारकांना रस्त्याने मार्ग काढताना चांगलीच कसरत करावी लागते. या रस्त्यांवरून जीव मुठीत घेऊनच मार्गक्रमण करावे लागत असल्याने श्रीवर्धनकरांमध्ये संतापाची लाट आहे.

तालुक्यातील दिघी, सर्वे, म्हसळा व श्रीवर्धन या गावांना जोडणाऱ्या मुख्य रस्त्यावर अगणित खड्डे पडल्याने सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कामांची चांगलीच गुणवत्ता दिसत आहे. श्रीवर्धन तालुक्यातील शेखाडी मार्गे श्रीवर्धन, श्रीवर्धन ते बोर्ली तसेच बोर्लीपंचतन ते दिघी व आदगाव या प्रत्येक मार्गाला १६,१७ व १३ किलोमीटर अंतरानी जोडले .../२



## म्हसळा ग्रामीण रुग्णालयाच्या सुविधांत सुधारणा करण्यासाठी प्रयत्नशील : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

म्हसळा तालुक्यातील सर्वसामान्य माणसाला दर्जे दार आणि मोफत रुग्णसेवा मिळण्यासाठी खासदार सुनिल तटकरे यांनी शासन दरबारी विशेष प्रयत्न करून म्हसळा शहरात भव्य असे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय उभारले आहे. गेल्या दोन वर्षात हे रुग्णालय कार्यान्वित करण्यासाठी आणि त्याचा दर्जा उंचाविण्यासाठी पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी अथक मेहनत घेऊन रुग्णालयात स्वतंत्र कोविड सेंटर, रुग्णांसाठी ऑक्सिजन बेड, ऑक्सिजन कॉसेंट्रेटर, वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती, नवीन एक्स–रे मशीन, नवी रुग्णवाहिका, करोना प्रतिबंधक .../२



## चिरनेर जंगल सत्याग्रहाचा ९१ वा हुतात्मा स्मृतीदिन साधेपणाने साजरा

### बंदूकीच्या तीन फैरी झाडून हुतात्म्यांना शासकीय मानवंदना

**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण** : देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात २५ सप्टेंबर १९३० साली झालेल्या गौरवशाली व शौर्यशाली ऐतिहासिक चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या ९१ वा स्मृती दिनाचा कार्यक्रम काल अतिशय साधेपणाने साजरा करण्यात आला. यावेळी शासकीय इतमानाने पोलिसांनी बंदूकीच्या तीन फैरी झाडून हुतात्म्यांना शासकीय मानवंदना देण्यात आली.

देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात सविनय कायदेभंग आंदोलना अंतर्गत .../२



# चिघळत चाललेले दुखणे

महाराष्ट्र सरकारने केलेल्या याचिकेच्या संदर्भात, केंद्र सरकारने इतर मागासवर्गासंबंधीचा (ओबीसी) तपशील देण्यास दर्शविलेली असमर्थता दुर्दैवी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे पहिले सरकार आल्यापासूनच देशातील ओबीसींच्या आरक्षणाच्या प्रश्नाची हेळसांड चालू आहे. सर्वोच्च न्यायालयात केंद्र सरकारने सन २०११ मधील जनगणनेतील ओबीसींविषयीचा तथ्यात्मक तपशील, म्हणजे इम्पिरिकल डेटा देता येणार नाही, असे सांगितले. इतकेच नाही, तर सर्वोच्च न्यायालयाला असा आदेश देता येणार नाही, असाही गर्भित इशारा दिला आहे. असा तपशील द्यायचा की नाही, हा धोरणात्मक निर्णय असल्याने सर्वोच्च न्यायालय अशी सक्ती करू शकणार नाही, असे सरकारला म्हणायचे आहे. ते योग्य असले, तरी त्यातून प्रश्न सुटण्याऐवजी अधिकच गुंतागुंतीचा होईल, हे निश्चित. हे सगळे महाराष्ट्र सरकारच्या याचिकेच्या निमित्ताने होत असल्याने, आता महाराष्ट्र सरकारने केंद्र किंवा सर्वोच्च न्यायालय यांच्यावर अवलंबून न राहता, राज्यातील ओबीसींची गणना आणि त्यांच्यासंबंधीचा इम्पिरिकल डेटा यासंबंधी स्वतंत्रपणे व गंभीरपणे पावले टाकायला हवीत. नुसते अध्यादेश काढून काहीही होणार नाही. हा प्रश्न धसाला लावून सोडवावा लागणार आहे. तो सुटत नाही, तोवर सामाजिक शांतता नांदणार नाही. ओबीसींच्या आरक्षणाशी मराठा आरक्षणाचा प्रश्नही निगडीत आहे, हे विसरून चालणार नाही. एकीकडे, केंद्र सरकार न्यायालयात अशी भूमिका घेत असताना, राज्यातील सारे राजकीय पक्ष, नेते किंवा सरकार या प्रश्नाबाबत पुरेसे गंभीर आहेत, असे जाणवत नाही. निदान, विविध पक्षांमध्ये विखुरलेल्या ओबीसी नेत्यांनी तरी या प्रश्नात आता गंभीरपणे लक्ष घालावे. स्वातंत्र्यानंतर २०११च्या जनगणनेत अनुसूचित जाती आणि जमाती यांच्याव्यतिरिक्त इतर जातींची नोंद करण्यात आली आहे; मात्र हा तपशील जाहीर करण्यात आलेला नाही. ओबीसी या प्रवर्गात समावेश असलेल्या जातीजमातींविषयीच्या तपशिलांच्या नोंदी ४६ लाखांहून अधिक होत्या. या नोंदींचे पृथक्करण, त्यांची वर्गवारी आणि मूल्यमापन हे काम खरे तर डॉ. मनमोहन सिंग यांचे सरकार असतानाच सुरू होण्याची गरज होती. तसे ते झाले नाही. पुढे मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर, २०१५मध्ये हे काम अर्थतज्ज्ञ अरविंद पनगारिया यांच्या समितीकडे देण्यात आले. पनगारिया सरकारमधून बाहेर पडले ते सोडा; पण हे काम आजतागायत पुरे झालेले नाही. ते का पुरे केले नाहीत, असा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला विचारायला हवा. हे काम पुरे झाले असते, तर आज ओबीसी आरक्षणाचा तिढा सोडविण्यासाठी त्याचा निश्चितच उपयोग झाला असता; मात्र सरकारने हे मनावरच घेतले नाही. सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करताना केंद्र सरकारने एकंदरीतच जातवार तपशील नोंदविण्यात स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच त्रुटी राहिल्या आहेत आणि हे काम अत्यंत क्लिष्ट आहे, असा अतार्किक युक्तिवाद केला आहे. ज्या देशातील जातिव्यवस्थाच कमालीची गुंतागुंतीची आणि असंख्य उतरंडी असणारी आहे, तिथे तिचे तपशीलवार विश्लेषण हे शिवधनुष्य असणारच; पण त्यापासून पळ काढणे, हा मार्ग नाही. या समस्येला कधी तरी पूर्ण ताकदीनिशी भिडणे आवश्यक होते. एरवी, प्रत्येक बाबतीत वीरश्रीचा संचार होणाऱ्या मोदी सरकारने नेमक्या याच बाबतीत असे हतवीर्य का व्हावे, हे समजत नाही. यात पेच नेमका काय आहे, हे समजावून घ्यावे लागेल. २०११च्या जनगणनेचा तपशील पाहिला, तर देशात ओबीसींचे प्रमाण ३९.५ टक्के इतके असावे. याचा अर्थ, हा देशातील सगळ्यांत मोठा जातिवर्गसमूह आहे. अनुसूचित जाती २१.६, तर अनुसूचित जमाती १०.२ टक्के आहेत. दुसरीकडे, सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने मागेच आरक्षणाची एकूण मर्यादा ५० टक्क्यांच्या वर जाता कामा नये, असा निकाल दिला आहे. हे त्रांगडे सोडवायचे, तर ओबीसींचे आर्थिक; तसेच सामाजिक मागासलेपण निस्संशय सिद्ध व्हायला हवे. तसे ते सिद्ध होण्याचा खात्रीचा मार्ग म्हणजे इम्पिरिकल डेटा तपासणे आणि त्यातून योग्य ते निष्कर्ष काढणे. देशातील सर्व मागासांची टक्केवारी समजा ७० टक्क्यांच्या पुढे जात असेल, तर आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांवरच अडकवून ठेवणे, हेही योग्य नाही. आज देशातील एकूण नोकऱ्यांपैकी सर्व प्रकारच्या सरकारी, निमसरकारी नोकऱ्या पाच टक्केही नसतील. त्यातही सरकारचे एकूण आकारमान घटते आहे; मात्र शिक्षणात आरक्षण महत्त्वाचे आहे. त्याहूनही महत्त्वाचा मुद्दा सामाजिक न्यायाचा आणि सर्व स्तरांतील वंचितांना विश्वास देऊन सोबत घेण्याचा आहे. अनुसूचित जाती आणि जमातींबाबत सर्व सरकारांनी पुरोगामी भूमिका घेत, घटनेतील आरक्षणाची कालमर्यादा वाढवत नेली. मग असेच शहाणपण ओबीसींबाबत का दाखविले जात नाही? यातला तर्कदोष सर्वांना लवकर समजला, तर त्यात देशाचेच भले आहे.

# वैद्यकीय कर्मचाऱ्यांची कार्य अभिमानास्पद : आदिती तटकरे

## श्रीवर्धन तालुक्यातील विविध कामांचे भूमिपूजन



**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी – श्रीवर्धन मतदार संघात सदैव विकासकामांना प्राधान्य क्रम दिलेला आहे. जनतेच्या अडचणी लक्षात घेऊन त्याचे निराकरण करण्याच्या दृष्टिकोनातून मी पालकमंत्री या नात्याने सदैव तत्पर आहे. कोरोनाच्या संपूर्ण कालावधीमध्ये श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालयात साठी आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची पूर्तता करण्यात आपल्याला यश आलेला आहे.

कोरोना कालावधीमध्ये सर्वच वैद्यकी कर्मचाऱ्यांनी केलेलं कार्य कौतुकास्पद आणि अभिमानास्पद आहे असे प्रतिपादन रायगडचे पालकमंत्री आदिती तटकरे यांनी केले आहे. उपजिल्हा रूग्णालय श्रीवर्धन येथे शनिवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास आदिती तटकरे यांच्या हस्ते बायो मेडिकल वेस्ट ट्रेंटमेन्ट प्लांट , जनरेटर,ड्युरा सिलेंडर यांचे उद्घाटन करण्यात आले. आदिती तटकरे यांनी उपजिल्हा रुग्णालयाच्या बैठक गृहात उपस्थित असणाऱ्या सर्व वैद्यकीय कर्मचारी, श्रीवर्धन मधील नागरिक आणि विविध पक्षांचे पदाधिकारी यांना संबंधित केले.

आदिती तटकरे म्हणाल्या श्रीवर्धनचा सर्वांगिन विकास होण्याच्या दृष्टिकोनातून आम्ही सदैव प्रयत्नशील आहोत. श्रीवर्धन मतदार संघातील प्रत्येक व्यक्तीला दर्जेदार स्वरूपाची वैद्यकीय सेवा मिळावी त्या दृष्टिकोनातून उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धन येथे विविध आधुनिक तंत्रज्ञान युक्त उपकरणे उपलब्ध करण्यात आली आहेत.

माझ्या मतदारसंघातील प्रत्येक व्यक्तीला कोरोना कालावधीमध्ये उपजिल्हा रुग्णालयांमध्ये अतिशय उच्च दर्जाच्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. कोरोनाला प्रतिबंध करण्याच्या दृष्टिकोनातून मोठ्या स्वरूपात आर्टिफिशियल आणि अँटीजन टेस्ट करण्यात आल्या. आज मितीस आपण चांगल्या स्वरूपात कोरोना नियंत्रणात यशस्वी झालो आहोत. तालुका प्रशासनातील सर्व अधिकारी वर्गाने अतिशय चांगल्या स्वरूपाचे काम कोरोना कालावधीत केले आहे. सरकारी यंत्रणेसोबत विविध सेवाभावी संस्थांनी जनतेतील विविध घटकांनी कोरोनाला पराभूत करण्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे योगदान दिलेले आहेत.

सुधीर म्हात्रे स्काय इलेक्ट्रिकल्स यांनी ड्युरा सिलेंडर उप–लब्ध करून दिले त्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करते.म्हसळा येथे ८ व श्रीवर्धन येथे ०७ ड्युरा सिलेंडर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. उपजिल्हा रुग्णालयात विजेची समस्या निर्माण होऊ नये त्या दृष्टिकोनातून आज जनरेटर सुद्धा आपण उपलब्ध केला आहे. मतदार संघातील सर्व जनतेला वैद्यकीय सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्यास प्राधान्य देण्यात आले आहे. आगामी काळामध्ये लवकरच रुग्णालयाच्या इमारतीच्या डागडुजीला सुद्धा सुरुवात करण्यात येईल. माझ्या मतदारसंघातील प्रत्येक व्यक्तीला दर्जेदार स्वरूपाची वैद्यकीय सेवा मिळवून देण्यासाठी मी कटिबद्ध आहे असे आदिती तटकरे यांनी सांगितले.

सदरच्या कार्यक्रमासाठी प्रांताधिकारी अमित शेडगे, उपजिल्हा रुग्णालयाचे शल्यचिकित्सक डॉक्टर मधुकर ढवळे, स्काय इलेक्ट्रिकल चे सुधीर म्हात्रे, नगराध्यक्ष फैसल हूर्झुक, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष दर्शन विचारे उपजिल्हा रुग्णालयातील सर्व वैद्यकीय कर्मचारी, राष्ट्रवादी पक्षाचे विविध पदाधिकारी आणि श्रीवर्धन मधील नागरिक उपस्थित होते.

# पागोटे येथील रक्तदान शिबीराला उत्तम प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील शिवसाई सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, पागोटे यांच्या वतीने दरवर्षी विविध अध्यात्म,संस्कृती , शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. हे मंडळ गेली १८ वर्षे साखर चौथच्या दिनी गणपती बाप्पाचा उत्सव साजरा करीत आला आहे.केवळ मौजमजा करमणूक म्हणून बाप्पाची स्थापना न करता प्रत्येक मंडळाने विविध उपक्रम राबवले पाहिजे या उद्देशाने गेली १८ वर्षे सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न म्हणून अनेक सामाजिक उपक्रम मंडळाने राबविले आहे. त्यातीलच जवळपास ७ वर्षे नियमित राबवित असलेला उपक्रम आणि सध्याच्या कोरोना काळात ज्याची नितांत गरज आहे असा उपक्रम म्हणजे रक्तदान शिबिर. यावर्षीही शनिवार दि.२५ सप्टेंबर २०२१ रोजी सकाळी ९:३०ते दुपारी ३ या वेळेत श्री काशीनगर चा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडप, पागोटे, तालुका उरण या ठिकाणी सद्गुरू चॅरिटेबल ट्रस्ट, नवी मुंबई यांच्या सहकार्याने महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. इच्छुक रक्तदात्यांनी सामाजिक बांधिलकी म्हणून या शिबिरात रक्तदान करून समाजाप्रती आपली बांधीलकी जपण्याचा प्रयत्न केला.एकूण ३२ रक्तदात्यांनी रक्तदान केले.सदर रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी शिवसाई सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ पागोटे या मंडळाच्या सर्व पदाधिकारी सदस्यांनी विशेष मेहनत घेतली. यावेळी सामाजिक, राजकीय व कला क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



पृष्ठ क्र.१ वरुन...

## श्रीवर्धनमधील रस्त्यांची दुर्दशा ; चार प्रमुख मार्गावर खड्डेच खड्डे

गेले आहे. जवळपास ७० किलोमीटर रस्ते क्षेत्रामध्ये संपूर्ण तालुक्यातील या गावांना विभागले आहे. मात्र, या सर्वच रस्त्यांवर सद्या वाहने चालवणे सोडाच पण चालणे देखील जिकरीचे झालं आहे.

तालुक्यातील बहुतेक रस्ते हे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या तर काही रस्ते हे जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत्या येतात. मात्र, रस्त्यांच्या दुरुस्तीकडे सार्वजनिक बांधकाम खात्याचे लक्ष नाही. परिणामी, पावसाळ्यात नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. येथे पावसाळा आणि रस्त्यावरील खड्डे याचे कारण पुढे करण्यात येते. पावसाळ्यात खड्डे पडणे स्वाभाविक असले तरी त्यानिमित्ताने जिल्हा परिषदेत व राज्य शासनाच्या रस्त्याचा दर्जा कितपत आहे त्याचे पितळच उघडे पडत असते.

मुंबई ते श्रीवर्धन अंतर १९८ किलोमीटरचे आहे. तर पुण्याहून श्रीवर्धन १६८ किलोमीटर असून, हे अंतर ५ तासांमध्ये पार केले जाते. मात्र, श्रीवर्धन तालुक्यात येणाऱ्या पर्यटकांना व स्थानिक नागरिकांना येथील रस्त्याच्या दुरावस्थेमुळे मोठा त्रास होत आहे. येथील रस्त्यांची कामे रखडल्याने तास, दीड तास अवघ्या १६ किलोमीटरचे अंतर पार करण्यास लागत आहे.

पावसाळा सुरू होण्यापूर्वी बांधकाम खाते अनेक रस्त्यांची डागडुजी तात्पुरत्या स्वरूपात वार्षिक निधीतून करते. परंतू, यंदा अनेक रस्त्यावर ही डागडुजी करण्याची गरज असतानाही या खात्याने त्याची तसदी घेतली नाही. यामुळे अख्खा पावसाळा पाण्यातून मार्ग काढत नागरिकांना घालवावा लागला. पावसामुळे खड्डे भरता आले नाही. आता पाऊस थांबल्यामुळे रस्ता दुरुस्तीचे काम लवकरच करण्यात येईल अशी माहिती बांधकाम विभागाकडून देण्यात आली.

## म्हसळा ग्रामीण रुग्णालयाच्या सुविधांत सुधारणा करण्यासाठी प्रयत्नशील : ना.आदिती तटकरे

लसीकरण केंद्र, औषध पुरवठा आदी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत आणि यापुढेही येथे आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी आज येथे दिली.

म्हसळा ग्रामीण रुग्णालयात उपलब्ध करून दिलेल्या बायो मेडिकल वेस्ट प्लांटचे उद्घाटन तसेच १२ ड्युरा ऑक्सिजन सिलेंडरचे लोकार्पण पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी जेष्ठ नेते अलीशेठ कौचाली, समीर बनकर, सभापती छाया म्हात्रे, उपसभापती संदीप चाचले, पंचायत समिती सदस्य मधुकर गायकर, उपविभागीय अधिकारी अमित शेडगे, तहसिलदार समीर घारे, पोलीस निरीक्षक उद्धव सुर्वे, गटविकास अधिकारी वाय.एम.प्रभे, प्रकल्प अधिकारी व्यंकट तरवडे, बांधकाम अभियंता गणगणे, पाणी पुरवठा अभियंता युवराज गांगुर्डे, डॉ.कराड, माजी सभापती नाजीमभाई हसवारे, नगराध्यक्षा जयश्री कापरे, रेश्मा काणसे, शगुप्ता जहांगीर, शांताराम गायकर, संजय कर्णिक, शाहीद उकये,सतीश शिगवण, महेश घोले, किरण पालांडे, शेखर खोत, सलीम बागकर, प्रकाश गाणेकर आदी मान्यवर पदाधिकारी व आरोग्य विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

पालकमंत्री आदिती तटकरे यांनी करोना कालावधीत आरोग्य सेवा केलेल्या मात्र सध्या सेवेतून कमी केलेल्या स्थानिक कंत्राटी कामगारांच्या आणि नवीन सेवा कर्मचारी भरती बाबत समस्या जाणून घेतल्या. म्हसळा तालुक्याप्रमाणेच तळा तालुक्यात लवकरच ग्रामीण रुग्णालयात उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. शासन दरबारी तालुका स्तरावर ग्रामीण रुग्णालय उभारणी करण्यात येणार असल्याची कार्यवाही करण्यात आली असून तळा तालुक्यात तातडीने कार्यवाही करण्यासाठी पालकमंत्री आदिती तटकरे यांनी एमइपीएल च्या संचालिका श्रीमती सुधा म्हात्रे यांना सूचित केले.

## चिरनेर जंगल सत्याग्रहाचा ९१ वा हुतात्मा स्मृतीदिन साधेपणाने साजरा

देशभरात आंदोलने सुरु होती. इंग्रज भारत छोडोचा नारा देत देशभरात आंदोलनाचा भडका उडाला होता.त्याच वेळी चिरनेर येथेही २५ सप्टेंबर १९३० साली जंगल सत्याग्रह आंदोलन सुरु करण्यात आले होते.शांततामय रितीने सुरु असलेल्या जंगल सत्याग्रहात शेतकरी,आगरी, आदिवासी असे सुमारे दोन हजार आंदोलक सहभागी झाले होते. यामध्ये २० ते २२ वयोगटातील युवकांचाच अधिक भरणा होता. जंगल का कायदा तोड दिया,इंग्रज भारत छोडोचा नारा देत आक्कादेवीच्या डोंगराकडे निघालेल्या आंदोलनकर्त्यांवर जुलमी ब्रिटिश पोलिसांनी निर्दयपणे बेछुट केला.

या गोळीबारात धाकू गवत्या फोफेरकर, नाग्या महादु कातकरी दोघेही चिरनेर, रामा बामा कोळी – मोठीजुई , हसुराम बुधाजी घरत – खोपटे,रघुनाथ मोरेश्वर शिंदे (न्हावी) – कोप्रोली,परशुराम रामा पाटील – पाणदिवे आनंदा माया पाटील – धाकटीजुई,आलु बेमट्या म्हात्रे – दिघोडे या उरण तालुक्यातील आठ हुतात्म्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. तर अनेकजण जखमी झाले.स्वातंत्र्य लढ्यातील चिरनेर जंगल सत्याग्रहाचा हा लढा देशभरात प्रसिध्द आहे. या लढ्यात उरण तालुक्यातील धारातिर्थी पडलेल्या आठ हुतात्म्यांची स्मारके शासनाने परिसरातील त्यांच्या मुळगावी उभारली आहेत.

स्वातंत्र्य संग्रामातील या महत्वाच्या लढ्यात बलिदान दिलेल्या हुतात्म्यांचे आणि स्वातंत्र्यासाठी दिलेल्या लढयाचे सर्वांनाच स्मरण व्हावे आणि हुतात्म्यांच्या स्मृती कायम तेवत राहावी यासाठी दरवर्षी २५ सप्टेंबर रोजी चिरनेर येथे हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहण्याचा कार्यक्रम शासकीय इतमानाने साजराही करण्यात येतो. बंदुकीच्या फैरी झाडून हुतात्म्यांना अभिवादन, मानवंदना दिली जाते.पुष्पचक्र वाहात हुतात्म्यांचे स्मरण केले जाते.तसेच हुतात्म्यांच्या वारस, कुटुंबातील सदस्यांचा यथोचित सत्कार, सन्मान करण्यात येतो.

ऐतिहासिक महत्व असलेल्या आणि स्वातंत्र संग्रामातील सुवर्ण पान म्हणुन ओळखला जाणाऱ्या चिरनेर जंगल सत्याग्रहाचा स्मृती दिनाचा ९१ वा स्मृतीदिन सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत काल साधेपणाने पार पडला. ठिक १२ : ०० वाजता पोलिसांनी बंदूकीच्या तीन फैरी झाडून हुतात्म्यांना पोलिसांनी शासकीय मानवंदना दिली.अभिवादन केले.त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पचक्र वाहून हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले.

पनवेलचे आ.प्रशांत ठाकूर व उरणचे आ.महेश बालदी यांना पुढील कार्यक्रमासाठी पनवेल येथे जाण्यासाठी त्यांनी सकाळच्या सत्रात हुतात्म्यांना आदरांजली वाहिली. याप्रसंगी रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा योगिता पारधी, रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा कामगार नेते महेंद्र घरत, जिल्हा प्रमुख माजी आमदार मनोहर भोईर,जिल्हा परिषद सदस्य बाजीराव परदेशी,उरण पंचायत समितीच्या सभापती समिधा म्हात्रे, उपसभापती शुभांगी पाटील,उरण तहसिलदार भाऊसाहेब अंधारे, गटविकास अधिकारी निलम गाडे उरण वरिष्ठ पोलिस निरिक्षक रविंद्र बुधवंत,चिरनेर सरपंच संतोष चिर्लेकर यांच्यासह चिरनेर ग्रामपंचायतीचे सदस्य आणि ग्रामस्थ आदी मान्यवर उपस्थित होते.

# रोहा तालुका पेन्शनर संघटनेच्या अध्यक्षपदी मारुती राऊत यांची निवड

**दै.रायगड नगरी । गोवे–कोलाड**

रोहा तालुका पेन्शनर संघटनेच्या अध्यक्षपदी आंबेवाडी नाका येथील रहिवासी मारुती बाळू राऊत यांची निवड करण्यात आली आहे.

रोहा तालुक्यातील पेन्शनर संघटनेची सभा बुधवार दि.२२ सप्टेंबर २०२१ रोजी रोहा येथील जेष्ठ नागरिक सभागृहात आयोजित करण्यात आली होती.या आयोजित करण्यात आलेल्या सभेत रोहा तालुका पेन्शनर संघटनेच्या अध्यक्षपदी मारुती बाळू राऊत यांची बिनविरोध निवड करण्यात आली.


तर उपाध्यक्ष शेखर गुंड, सचिव नारायण पाटील, तर सदस्य पदी सुरेश मोरे, देसाई मॅडम, गुडेकर, वाळेकर, बामुगडे,मळेकर मॅडम,गावडे गुरुजी,देशमुख,नागवेकर,यांची निवड करण्यात आली तर नागोठणे विभाग प्रमुख झोलगे,कोलाड विभाग प्रमुख जंगम, तर घोसाळे विभाग प्रमुख भोस्तेकर यांची निवड करण्यात आली आहे.

मारुती राऊत यांना कृषीभुषण पुरस्कार ही मिळाला असुन ते रायगड जिल्हा जेष्ठ नागरिक संघटनेचे सदस्य,कोलाड जेष्ठ नागरिक कार्यकारणी संचालक,या पदावरही कार्यरत असून ते कोलाड विभागातील तरुणांना मोलाचे मार्गदर्शन करत असतात त्यांच्या या निवडी बद्दल त्यांचे रोहा तालुका पेन्शनर संघटना,कोलाड जेष्ठ नागरिक संघटना, पत्रकार, शैक्षणिक, सामाजिक, तसेच विविध संघटना यांच्याकडून मारुती राऊत यांचे अभिनंदन करण्यात आले असुन पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या

# गुलाब चक्रीवादळ उद्या धडकणार; महाराष्ट्राला झोडपणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचे रुपांतर आता गुलाब नावाचे चक्रीवादळात झाले असून, हे चक्रीवादळ रविवारी सायंकाळी ओरिसा – आंध्रप्रदेशच्या किनारी भागात धडकणार आहे. महत्त्वाचे म्हणजे हे चक्रीवादळ महाराष्ट्र ओलांडून अरबी समुद्रात प्रवेश करण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे. जर का ही शक्यता खरी ठरल्यास राज्यात २७ ते २९ सप्टेंबरदरम्यान बऱ्यापैकी पाऊस होईल, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे.



भारतीय हवामान शास्त्र विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, कमी दाबाच्या क्षेत्रामुळे हवामानात बदल झाले असून, २६ सप्टेंबर रोजी दक्षिण ओरिसा, छत्तीसगड, आंध्रप्रदेशच्या समुद्राचा उत्तरेकडील भाग, तेलंगणा, उत्तर छत्तीसगड आणि उत्तर ओरिसामध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस कोसळले. २७ सप्टेंबर रोजी विदर्भ, दक्षिण छत्तीसगड, ओरिसा, मराठवाडा, तेलंगणा आणि पश्चिम बंगाल किनारी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस कोसळले. दरम्यान, सोमवारपासून राजस्थान, मध्य प्रदेश, गुजरात, कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस कोसळण्याची शक्यता असून, हवामानात झालेल्या बदलामुळे पूर्वेकडील समुद्र खवळलेला राहील. परिणामी मच्छिमारांनी समुद्रात उतरू नये, असे आवाहन हवामान खात्याने केले आहे.

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचे रुपांतर आता चक्रीवादळात झाले आहे. रविवारी सायंकाळी हे चक्रीवादळ ओरिसा आणि आंध्रप्रदेशच्या किनारी धडकेल. या चक्रीवादळाचा प्रभाव म्हणून संपुर्ण महाराष्ट्रात पावसाची शक्यता आहे. २७ सप्टेंबरपासून विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात मुसळधार पाऊस पडेल. वेगाने वारे वाहतील. कोकणात २६ ते २८ सप्टेंबरदरम्यान वा–याचा वेग वाढेल. काही ठिकाणी मुसळधार स्वरुपाचा पाऊस पडेल.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## सप्तरंगी मित्र मंडळाचा मजगांवचा राजा साखरचौथ गणपती



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील मजगांव सप्तरंगी मित्र मंडळातर्फे दरवर्षी प्रमाणे साजरा करण्यात येणा-या साखरचौथ गणपतीची प्राणप्रतिष्ठापना यंदाही कोरोनाच्या महामारी मुळे साधेपणाने करण्यात आली.यावेळी पूजेचा मान संतोष भोईर यांना सपत्निक मिळाला.

सप्तरंगी मित्र मंडळातर्फे साजरा करण्यात येणा-या साखरचौथ गणपती उत्सवाचे यंदाचे सहावे वर्ष असून यानिमित्ताने शुक्रवार दि.२४ सप्टेंबर २०२१ रोजी सकाळी ८.३० वा.श्रीमुर्तीची विधिवत प्राणप्रतिष्ठापना, आरती करण्यात आली.यानिमित्ताने श्रीविष्णू प्रासादिक भजन मंडळ (दोडकुळे) तर्फे सुश्राव्य बहारदार भजनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला व रात्री महाआरती करण्यात आली.शनिवार दि.२५ सप्टेंबर २०२१ रोजी सकाळी विधिवत पूजा अर्चा करण्यात आली.उत्तर पूजेचा मान पांडुरंग हरी ढमाले यांना सपत्निक देण्यात आला.यानंतर दुपारी ४.०० वा.नंतर श्रीमुर्तीची गावातून मिरवणूक काढण्यात येऊन बाप्पाला साधेपणाने भावपूर्ण निरोप देण्यात आला.


सप्तरंगी मित्र मंडळाचे अध्यक्ष संतोष भोईर, उपाध्यक्ष अनिल पाटील,सचीव अतिश आयरकर, उपसचिव महेश पाटील,खजीनदार अल्पेश पाटील,उपखजीनदार दिपक घाग, सल्लागार गजानन भोईर, सुनील आयरकर, प्रशांत मिठागरी, राजेंद्र पाटील, काशिनाथ ढमाले, अशोक पाटील, सुरेश भोईर, विजय धसाडे, श्रीकांत पाटील, संजय गवंडी, रमेश पाटील, रवींद्र बैकर,सागर पाके, कृष्णा पाटील, समीर पाटील, गजानन पाटील, अनंत पाटील, मंगेश पाटील, अरुण पाटील, प्रशांत पाटील, दिपक गवंडी, महेश पाके, पांडुरंग ढमाले सदस्य यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विशेष परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय अकस्मात हृदयरोग जागरूकता सप्ताहाचे राज्यमंत्री कु.तटकरे यांच्या हस्ते उद्घाटन

**दै.रायगड नगरी । मुंबई**

सध्याच्या धकाधकीच्या जीवनामुळे आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे हृदयविकाराचा झटका आलेला देखील काही वेळा समजत नाही. हृदयविकार नेमका कसा ओळखायचा इतपासून ते हृदयविकाराचे प्रकार आणि तातडीचे प्राथमिक उपचार याची माहिती असणे गरजेचे आहे. आणि अशा माहितीसह प्रशिक्षणाचा कार्यक्रम माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने 'आय केअर' संस्थेच्या सहकार्याने अधिकारी-कर्मचारी तसेच राज्यातील सर्व माध्यमकर्मीसाठी आयोजित केला तो अत्यंत स्तुत्य व अभिनंदनीय आहे, असे गौरवोद्गार माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या राज्यमंत्री कुमारी आदिती तटकरे यांनी काढले.

आय केअर संस्था आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय अकस्मात हृदयरोग जागरूकता सप्ताहाच्या दूरदृश्यपणालीद्वारे प्रशिक्षण सत्राचे उद्घाटन राज्यमंत्री कु.तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे सचिव तथा महासंचालक डॉ.दिलीप पांढरपट्टे, संचालक(प्रशासन) गणेश रामदासी, संचालक(वृत्त) दयानंद कांबळे, आय केअरचे डॉ.यश लोखंडवाला (हृदयरोग तज्ज्ञ), डॉ.ब्रायन पिंटो (कार्डियोलॉजिस्ट), डॉ. किंजल गोयल (मानसोपचारतज्ज्ञ), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय अंतर्गत राज्यातील



अधिकारी-कर्मचारी व पत्रकार ऑनलाईन सहभागी झाले होते. अल्प व मध्यमवयीन नागरिक सुध्दा या अकस्मात हृदयरोगाला बळी पडत आहेत. हृदयाचा झटका आणि कार्डियाक अरेस्टची घटना आपल्या आजूबाजूला घडत असते तेव्हा अशा प्रकारचे कार्डिओ पल्मोनरी रिसिटेशन (सीपीआर)चे माहिती व प्रशिक्षण असेल तर काही मिनिटाच्या सुवर्णकाळात आपण त्या रुग्णाचे प्राण वाचवू शकतो यासाठी प्राथमिक उपचाराची माहिती असणे आवश्यक आहे. हृदयविकाराचा झटका आणि कार्डियाक अरेस्ट जनजागृतीमुळे नागरिकांचा जीव वाचविण्यास मदत होईल असेही राज्यमंत्री कु.तटकरे यांनी सांगितले. बदलत्या जीवनशैलीमध्ये तणाव वाढल्याने अनेक रोगांना सामोरे जावे लागत आहे. या धकाधकीच्या जीवनशैलीत आरोग्य विषयक जागृत राहून तणामुक्त आणि आरोग्यदायी जीवन कसे जगले पाहीजे याचे प्रशिक्षण मिळणे गरजेचे आहे. असे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे सचिव तथा महासंचालक डॉ.दिलीप पांढरपट्टे यांनी या प्रशिक्षण सत्रांचे प्रास्ताविक करताना सांगितले. डॉ. पांढरपट्टे म्हणाले की, बदलत्या माध्यमांनुसार आणि माध्यमातील स्पर्धेमुळे पत्रकारांचे आयुष्य धकाधकीचे आणि धावपळीचे झालेले आहे. महासंचालनालयाचे कामही तसे शासकीय परंतु पत्रकारीतेचे आहे असे म्हटले जाते. माध्यमातील लोकांना सतत कार्यरत राहून सतर्क रहावे लागते. यामुळे ताण वाढतो त्याने अनेक आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात.त्यासाठी आरोग्यविषयक जागृत राहणे आवश्यक आहे. हृदयविकाराचा झटका आणि कार्डियाक अरेस्टच्या प्राथमिक उपचारासाठी कार्डिओ पल्मोनरी रिससिटेशन (सीपीआर) हे माहितीपूर्ण प्रशिक्षण आपल्या जवळच्या मित्राचे, नातेवाईकांचे प्राण वाचविण्यास उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला व अशा प्रकारचा जनजागृती व जनसंपर्काच्या कार्यक्रमात सहभागी झाल्याबद्दल सर्वांना धन्यवाद दिले.

हृदयविकाराचा झटका किंवा कार्डियाक अरेस्टची घटना आपल्या अवतीभोवती घडल्यास कशाप्रकारे तातडीने तीन मिनिटांमध्ये चार टप्प्यातील तातडीची वैद्यकीय मदत केल्यास मृत्यु टाळता येऊ शकतो. यासंदर्भात जनजागृती करण्यासाठी राष्ट्रीय अकस्मात हृदयरोग जागरूकता सप्ताहाच्या निमित्ताने उद्घाटनाचा प्रशिक्षण कार्यक्रम माहिती व जनसंपर्क महासंचालनालयासोबत आय केअरने शनिवारी आयोजला होता. या प्रशिक्षणामध्ये अचानक हृदयविकाराचा झटका येणाऱ्या पिडीतांना वैद्यकियदृष्ट्या मेंदू मृत होण्यापासून बचाव करण्यासाठी योग्यवेळी सीपीआर (कार्डिओ पल्मोनरी रिससिटेशन) म्हणजेच हाताने हृदयावर दाब देणे शक्य तितक्या लवकर सुरू करणे गरजेचे आहे, सीपीआर आणि शॉक मशीन (एईडी मशीन)चा वापर करण्याचेही प्रशिक्षण दूरदृश्य माध्यमाव्दारे दिले. जेणेकरून आपल्या जवळची व्यक्ती किंवा नातेवाईकाचे प्राण वाचविण्यास सहकार्य करता येईल.

डॉ.सुमय्या राघवन आणि डॉ.आनंद श्रीव-ास्तव यांनी दूरदृश्यमाध्यमाव्दारे हृदयविकाराचा झटका व कार्डियाक अरेस्ट यातील फरक कसा ओळखावा आणि तीन मिनिटांमध्ये रुग्णाचा उपचार सुरु करणे आवश्यक आहे. याचे चार टप्प्यांमध्ये सादरीकरणाद्वारे प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणानंतर आय केअरचे डॉ.यश लोखंडवाला (हृदयरोग तज्ज्ञ), डॉ.ब्रायन पिंटो (कार्डियोलॉजिस्ट), डॉ.किंजल गोयल (मानस-ोपचारतज्ज्ञ) यांनी यावेळी अकस्मात हृदयरोग या विषयावर मार्गदर्शन केले व वेबिनार मध्ये सहभागी झालेल्यांच्या प्रश्नांना उत्तरेही दिली.

दरम्यान सुरुवातील हृदयविकाराचा झटका किंवा कार्डियाक अरेस्ट या संदर्भातील सीपीआर (कार्डिओ पल्मोनरी रिससिटेशन) प्रशिक्षणाची उपयुक्तता संदर्भात क्रिकेटर सुनील गावस्कर, सिनेअभिनेता आमीर खान, कार्तिक आर्यन, अभिनेत्री भाग्यश्री पटवर्धन यांचा जनजागृतीपर संदेश प्रसारित करण्यात आला.

# गोवे येथे प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना कार्यशाळा संपन्न

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यातील गोवे येथील महिला कार्यशाळेत गुरुवार दि.२३सप्टेंबर २०२१ रोजी रोहा कृषी विभागाच्या वतीने प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. याचे मार्गदर्शन यावेळी उपस्थित मान्यवरांनी केले. यावेळी महिला सक्षमीकरणासाठी या योजना कशा प्रकारे लाभदाय आहेत.? व यासाठी महिलांनी स्वतःच्या कर्तृत्वावर आपला छोटा उद्योग उभा करुन आर्थिकदृष्टया सक्षम व्हावे व यासाठी महिला बचत गट एकत्र येऊन काम करणे गरजेचे यासाठी शासनाकडून आम्ही वेळोवेळी आपणास मार्गदर्शन करु असे



प्रतिपादन कृषी पर्यवेक्षक हेगडे यांनी महिलांना मार्गदर्शन करतांना केले. तसेच शासनाकडून विविध योजना राबविल्या जात असून याचा फायदा प्रत्येक बचत गटांनी घ्यावा यासाठी कृषी पर्यवेक्षक मढवी व कृषी सहाय्यक श्रीमती दोरुगडे यांनी महिलांना मार्गदर्शन केले.यावेळी गोवे ग्रामपंचायत सदस्या सुप्रिया जाधव, रंजिता जाधव,पोलिस पाटील सुरेश जाधव, संदीप जाधव, तसेच गोवे गावा-तील १५ बचत गटाच्या पदाधिकारी व सर्व सदस्या उपस्थित होत्या. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महिलांना मोलाचे मार्गदर्शन केल्या बद्दल सुप्रिया जाधव यांनी त्यांचे आभार व्यक्त करुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# सर्पमित्र अजय भोसले याने दिले आठ फुटी सर्पाला जीवदान

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील नडवली गावचा सुपुत्र व सर्पमित्र म्हणून विशेष ओळख असणाऱ्या अजय भोसले याने आठ फुट लांबीच्या नागास सुरक्षितपणे पकडून जीवदान दिले आहे.

धाटाव औद्योगिक वसाहतीतील निलिकाँन कंपनीत एका गोडाऊन बाजूस सर्प शिरला असल्याची माहिती मिळताच अजय भोसले याने तिथे जाऊन अत्यंत अडचणीच्या ठिकाणी शिरलेल्या व अत्यंत विषारी असलेल्या आठ फुटी सर्पास मोठ्या शिताफीने पकडून जीवदान दिले आहे.

सर्पमित्र अजय याने विषारी सर्पास मोठ्या शिताफीने पकडल्याने सर्वांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. तत्पूर्वी सापाबद्दल उलट सुलट चांगलीच चर्चा रंगात आली होती. आठ फुटी लांबीच्या विषारी सर्पास अजयने मोठ्या कौशल्याने पकडून अजय सर्वांना चांगलेच आश्चर्यचकित केल्याने त्याच्या या धाडसाचे सर्वत्र कौतूक होताना दिसत आहे. तर याकामी सर्पमित्र अजय भोसले यास त्याचा मित्र अजय राजिवले याचेही मोलाचे असे सहकार्य लाभले असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान सर्पमित्र अजय भोसले याने आतापर्यंत शेकडो विषारी व बिनविषारी सापांना सुरक्षितरित्या पकडून त्यांना जीवदान दिले आहे.



# शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन करून नवरात्र उत्सव साजरा करणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

२५ सप्टेंबरला दरवर्षी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती नगरसेवक विक्रांत पाटील यांच्या जनसेवा कार्यालयात साजरी करण्यात येते.हा दिवस सम्पर्ण दिन आणि सेवा सप्ताह म्हणून साजरा करण्यात येत आहे. यावेळी पंडितजींच्या प्रतिमेला पुष्पहार आणि फुलं अर्पण करण्यात आले.जो पर्यंत तळागाळातील लोकांच्या पर्यंत सर्व मूलभूत सुविधा पोहचत नाही तो पर्यंत आपल्या देशाचा विकास होणार नाही आणि देश मजबूत राहणार नाही असें पंडितजींचे म्हणणे होते.असे मनोगत यावेळी मा.कोकण म्हाडा सभापती सन्मा श्री बाळासाहेब पाटील यांनी जमलेल्या कार्यकर्त्यांच्या व्यक्त केले.या कार्यक्रमाला प्रदीप देशमुख, तानाजी खंडागळे,देविदास खेडकर,विद्यासागर सोनावणे व इतर मान्यवर उपस्थित होते.



# शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन करून नवरात्र उत्सव साजरा करणार

## श्री जोगेश्वरी माता उत्सव समितीचा एकमुखी निर्णय



**दै.रायगड नगरी । वाकण**

येत्या दिवसांतच नवरात्र उत्सवाला प्रारंभ होत असून हा नवरात्र उत्सव कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर शासनाने लागू केलेल्या नियमांचे काटेकोर पद्धतीने पालन करून साजरा करणार असल्याचा एकमुखी निर्णय नागोठण्याची ग्रामदैवता श्री जोगेश्वरी माता उत्सव समितीचे पदाधिकारी व सदस्य यांनी घेतला आहे. यासंदर्भात श्री जोगेश्वरी माता मंदिर विश्वस्त समितीचे सचिव भाई टके यांच्या निवासस्थानी गुरुवार दि. २३ सप्टेंबर रोजी सायंकाळी झालेल्या उत्सव समितीच्या बैठकीत घेण्यात आला. यावेळी विश्वस्त समितीचे सचिव भाई टके, उत्सव समितीचे अध्यक्ष, बाळासाहेब टके, उपाध्यक्ष विनायक गोळे, सचिव अनिल नागोठणेकर, खजिनदार, अनंत मोरवणकर, सहसचिव किरण लाड, विश्वस्त तसेच मंदिराचे पुजारी अशोक गुरव, सदस्य पांडुरंग कोळी, मच्छिंद्र साळुंखे, राजेंद्र राउत, राजेंद्र गुरव, हनुमान बेलोसे, जगदीश चौलकर, संतोष नागोठणेकर, रविंद्र गोलिपकर, दिपक वाडेकर, दिनेश घाग, अशोक भंडारे, संजय राजीवले आदी उपस्थित होते. दरम्यान यावेळी विश्वस्त समितीचे सचिव भाई टके यांनी नवरात्र उत्स-वात साजरा करण्यात येणाऱ्या विविध धार्मिक कार्यक्रमांविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच जोगेश्वरी माता मंदिराच्या आवारात साजरा होणारा हा आपला पारंपरिक उत्सव गेल्या अनेक वर्षाप्रमाणे यावर्षीही कुठलेही गालबोट न लागता साजरा करणार असल्याची परंपरा कायम राखणार असा विश्वासही उत्सव समिती अध्यक्ष बाळासाहेब टके यांनी यावेळी व्यक्त केला. या बैठकीत उत्सव समितीचे खजिनदार बबन मोरवणकर यांनी मागील वर्षाचा जमाखर्च सादर करून उपस्थित मंडळाचे पदाधिकारी व सदस्यांच्या सह्या घेऊन आपले कर्तव्य पार पाडले. नंतर बैठकीची सांगता झाली तत्पूर्वी उस्तव कमिटीचे सचिव अनिल नागोठणेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# रोहे ग्रामीण भागात साखरचौथ गणेशोत्सव सोहळा भक्तीमय वातावरणात संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे ग्रामीण भागात साखरचौथ गणेशोत्सव सोहळा भक्तीमय वाता-वरणात संपत करण्यात आला. दहा दिवसांचा गणेशोत्सवाचा सोहळा संपन्न झाल्यानंतर साखर चतुर्थीच्या दिवशी स्थापना करण्यात आलेल्या साखरचौथ गणेशोत्सवाचा सोहळा कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर साध्या पद्धतीने व भक्तीमय वातावरणात संपन्न करून रोहे तालुक्यातील ग्रामीण भागात गणरायाचे मोठ्या श्रद्धा पूर्वक विसर्जन करण्यात आले.

साखरचौथ गणेशोत्सवातंर्गत साखर चतुर्थीच्या दिवशी सकाळी गणेशाचे वाजत गाजत आगमनानंतर मोठ्या भक्तीमय वातावरणात विधिवत पूजा करून विविध धार्मिक तथा अध्यात्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावर्षीही तालुक्यातील विविध गावात अनेक वर्षापासून घरगुती व सार्वजनिक स्वरूपात हा उत्सव साजरा करण्यात येत



आला.

त्या अनुषंगाने साखरचौथ व दुस-या दिवशी गावागावात व घरोघरी मंगलमय व चैतन्यमय वातावरण निर्माण झाले होते.

दीड दिवसांच्या या उत्सव प्रसंगी गणरायांचे आगमन झाल्यानंतर महाआरती, हरिपाठ, जागर भजन, महाप्रसाद आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न करण्यात आले होते. तर विसर्जन प्रसंगी अतिशय शांततेत व शासकीय व उत्साही वातावरणात सार्वजनिक तलाव व नदीपात्रात श्री-गणेशाचे भक्तीने व श्रद्धापूर्वक विसर्जन करण्यात आले.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे : बीड, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत ही कै.राघो दुंदा पाटील व इतर १८ यांच्या सामाईक मालकीची, ताबेकब्जातील व वहिवाटीतील मिळकत आहे. सदरहू मिळकत ही श्री.राघो दुंदा पाटील व इतर १८ यांचेकडून आमचे अशिल ह्यांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : बीड, ता.पनवेल, जि.रायगड**

| गट क्र. | उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार |
|---|---|---|---|
| ५४ | ९ | ०-१९-०० पो.ख. ०-२४-०० एकूण ०-४३-०० | ०.२५ |

तरी वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपास, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, ट्रस्ट, मिळकत विकसित करण्याबाबतचा करार, समझोता करार, कुळ हक्क, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दिवाणी दावा, महसूली वाद असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ९ दिवसाच्या मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे अगर नमूद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजि. पोस्टाने पाठवावे.

येणेप्रमाणे कोणाचीही, कोणतीही हरकत अगर तक्रार या नोटीशीत नमूद केलेल्या मुदतीत आली नाही तर सदर मिळकत ही निर्वेध बोजारहीत व खरेदी घेण्यास योग्य आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजण्यात येईल हे सर्व लोकांस कळावे.

तळोजा

दि.२५/०९/२०२१

**सही/-**
**ॲड.सलमान रशिद पटेल**
**मु.पो.तळोजा पाचनंद, भारत राईस मिल जवळ, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९२२२२२२७१६**



मे.मुजावर साहेब

अर्जदारांचे वकील : ॲड.संतोष जे. म्हात्रे
ॲड.अनिकेत चौधरी
ॲड.आनंद पावशे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्त) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.११९७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२७/१०/२०२१

१) श्रीमती.कल्पना परेश शहा
२) श्री.पुनित परेश शहा
३) श्री.गौतम परेश शहा
सर्व रा.फ्लॅट नं.५०१, पाचवा मजला,
पंकज प्राईड को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.,
ठाणा नाका रोड, पनवेल, जि.रायगड ... अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ हिचे पती व अर्जदार नं.२ ते ३ यांचे वडील कै.परेश शामजी शहा हे दि.०३/०५/२०२१ रोजी मयत झाले आहेत. कै.परेश शामजी शहा यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावे वैयक्तीक व सामाईक मालकी हक्काच्या खालील वर्णनाच्या मिळकती होत्या.

अ) मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील पनवेल महानगरपालिका हद्दीतील जुना ठाणा नाका रोडवरील, प्लॉट नं.५०/८ या भूखंडावर बांधण्यात आलेल्या पंकज प्राईड को.ऑप.हौसिंग सोसायटीमधील पाचवे मजल्यावरील फ्लॅट नंबर ५०१, क्षेत्र ६५.७९ चौ.मी. कारपेट, अधिक ७.४३ चौ.मी. मोकळी टेरेस असलेली फ्लॅटची मिळकत आहे.

ब) मौजे : चिखले, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आहे.

| भूमापन नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ६६ | ३ | ०.२४.० | ४.७३ |

क) मौजे : सांगुर्ली, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आहे.

| भूमापन नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ७८ | ५ | ०.१८.० | ०.३१ |

तरी वरील मिळकतीबाबत कै.परेश शामजी शहा यांचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केला आहे. तरी सदर वारस दाखल्याच्याकामी कोणाच्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे आत मेहरबान कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला दिला जाईल याची नोंद घ्यावी. तारीख २१/०९/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाचे शिक्क्यानिशी नोटीस दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## म्हसळा नगर पंचायत कर्मचारी संतोष कुडेकर यांनी प्राप्त केली कला शाखेची पदवी

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा नगर पंचायत समितीचे गुणवान कर्मचारी तथा म्हसळा तालुका कुंभार समाजाचे समाजसेवक संतोष कुडेकर यांनी जिद्द आणि चिकाटीने अभ्यास करून सेवा काळात वयाच्या ५५ व्या वर्षी कळा शाखेची पदवी प्राप्त करून यश मिळविले आहे.सामाजिक सेवेच्या सर्वच क्षेत्रात आणि कार्यक्रमात सहभागी होऊन कार्य तडीस नेण्याची कार्यपद्धती असलेल्या संतोष कुडेकर यांनी जिद्दीने पदवी मिळवत भावी पिढीला पद आणि पदवी मिळवण्यासाठी वयाची अट लागत नाही हे सिद्ध करून दाखवले आहे.यश मिळविण्यासाठी हवी असते ती फक्त जिद्द आणि प्रचंड ईच्छाशक्ती असे आनंदी मनोगत कुडेकर यांनी व्यक्त केले आहे.त्यांनी मिळविलेल्या यशाचे संत गोरोबा काका कुंभार समाज तालुका म्हसळा ग्रामस्थ व महिला मंडळ,नगर पंचायत प्रशासन तसेच कुंभार समाज युवा नेते जितेंद्र पाभरेकर यांनी विशेष कौतुक करून अभिनंदन केले आहे.

## राज्यातील चित्रपटगृहे, नाट्यगृहे २२ ऑक्टोबरपासून सुरू करणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्यातील चित्रपटगृहे आणि नाट्यगृहे २२ ऑक्टोबरपासून आरोग्याचे नियम पाळून खुली करण्यास परवानगी देण्यात येईल असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी घोषित केले आहे.

यासंदर्भात सविस्तर कार्य पद्धती एसओपी तयार करण्याचे काम सुरू असून ती लवकरच जाहीर करण्यात येईल.

आज टास्क फोर्स सदस्य, खासदार संजय राऊत, मुख्य सचिव सीताराम कुंटे, अतिरिक्त मुख्य सचिव आरोग्य डॉ प्रदीप व्यास तसेच निर्माते रोहित शेट्टी, कुणाल कपूर, मकरंद देशपांडे, सुबोध भावे, आदेश बांदेकर व नाट्य क्षेत्रातील मान्यवरांशी मुख्यमंत्र्यांनी बैठकीत चर्चा केली.

**वाचकांना विनम्र सूचना**


**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांनी घेतले खारी येथील साखर चौथ गणपती बाप्पांचे दर्शन

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

रोहे तालुक्यातील महत्त्वपूर्ण मानले गेलेल्या खारगाव ग्राम पंचायत हद्दीतील खारी येथील संकष्टी चतुर्थी निमित्ताने साखर चौथी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या निमित्ताचे औचित्य साधून बाप्पांच्या दर्शन घेण्यासाठी सदिच्छा भेटी दरम्यान राज्य मंत्री तथा रायगड जिल्हा पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांनी बाप्पांच्या दर्शन घेण्यासाठी सदिच्छा धावती भेट घेत दर्शन घेतले.

खारी ग्रामस्थ मंडळ व साखर चौथ गणेशोत्सव मंडळ, तरुण मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने गेले दहा वर्षांपासून भाद्रपद महिन्यातील गणेश चतुर्थी निमित्ताने पूर्वापार चालत आलेल्या प्रथेप्रमाणे येणारे घरगुती व सार्वजनिक गणेशोत्सव अनंत चतुर्दशी पर्यंत मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो.



अनंत चतुर्दशी नंतर येणाऱ्या पहिल्याच संकष्टी चतुर्थीला सर्वत्र चाहूल लागते ती ’साखर चौथी च्या गणपती बाप्पांच्या स्वागतासाठी ची जय्यत तयारी याच अनुषंगाने आज शुक्रवार रोजी सर्वत्र विघ्नहर्ता गणरायाचे मंगलमय व हर्षोल्लासित ,प्रसन्न वातावरणामध्ये गणराया गणपती बाप्पांचे मोठ्या उत्साहात आगमन झाले असून रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलेल्या राज्य मंत्री तथा रायगड जिल्हा पालकमंत्री ना.अदिती ताई तटकरे यांनी आजच्या दिवसाचे दिनविशेष म्हणून गावोगावी स्थानापन्न झालेले साखर चौथी च्या घरगुती पद्धतीने तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात येतो याशुभ दिनाचे औचित्य साधत पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांनी खारी रोहा येथील हनुमान मंदिर सभागृह येथे आयोजित करण्यात आलेल्या गणराया गणपती बाप्पांचे सार्वजनिक गणेशोत्सव–ाचे दर्शन घेण्यासाठी सदिच्छा भेटी दरम्यान सन २०२१ – २०२२ करिता आमदारांच्या स्थानिक कार्यक्रम विकास अंतर्गत काजुवाडी येथील स्वयंभू श्री गणंनाथ शिवालय मंदिर सामाजिक सभागृह – ५ लाख रुपये तसेच तारेघर येथील ग्राम दैवत तारामती मातेच्या मंदिरासमोरील सामाजिक सभागृह ७.५ लाख रुपये बांधणे कामी चे मंजुरी पत्रक खारगाव ग्राम पंचायतीचे उपसरपंच नितीन मालुसरे, सतेज आपणकर, शैलेश खिरीट,अवधूत मातेरे, ग्रामस्थ मंडळ, खारी – तारेघर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

यावेळी बोलताना ना.अदिती ताई तटकरे यांनी खारगाव ग्रा.पंचायती हद्दीतील तरुण पिढीने अतिशय स्तुत्य असा उपक्रम हाती घेतला असून या माध्यमातून गावाचे सांस्कृतिक वारसा जोपासला जात असून सामाजिक बांधिलकी जपण्याच्या दृष्टीने विकासकामांना निश्चितच चालना मिळेल.

तर कोकणचे भाग्यविधाते खा.सुनील तटकरे व कोकण स्थानिक स्वराज्य मतदार संघाचे विधान परिषद सदस्य आमदार अनिकेत भाई तटकरे यांनी वेळोवेळी सामाजिक हिताच्या प्रश्न सोडविण्यासाठी नेहमीच प्रधान्य दिले आहे व भविष्यात देखील जिव्हाळ्याचे प्रश्न आम्ही निश्चितच प्राधान्याने सोडवू असे सांगतानाच खारगाव ग्रा.पंचयतीमधील विकासकामांसाठी यापुढेही आम्ही सदैव तत्पर असल्याचे सांगितले.

यासमयी त्यांच्या समवेत रोहा तालुका राष्ट्रवादी युवक अध्यक्ष जयवंत मुंढे,तसेच खारी विभागातील गणेश भक्त,सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थ मंडळ, महिला वर्ग उपस्थियांनी पक्ष श्रेष्ठींचे आभार मानून समाधान व्यक्त केले.

## कुर्डूस मतदार संघात विकासाची गंगा आणणार : आ.महेंद्र दळवी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कुर्डुस मतदार संघातील विकास हा तरुणांना केंद्रबिंदू माणून केला जाणार आहे. तरुणांच्या समस्या सोडविण्याबरोबरच या परिसरात विविध विकासकामे राबवून विकासगंगा आणण्याचे अभिवचन अलिबाग–मुरुडचे आमदार महेंद्र दळवी यांनी कुर्डुस मतदार संघातील नागरिकांना दिले आहे.

कुर्डुस येथील कार्यक्रमात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना पुढे म्हणाले की, अलिबाग तालुका प्रमुख राजा केणी यांच्या नेतृत्वाखाली जिल्हापरिषदेच्या कुर्डुस मतदार संघात शिवसेनेची घौडदौड सुरुच आहे. ही घौडदौड पाहून शेकापचे शेकडो कार्यकर्ते शिवसेनेत येण्यास तयार आहेत. काही दिवसात या कार्यकर्त्यांचा भव्य पक्षप्रवेश कार्यक्रम होणार आहे. राजकारणाबरोबर समाजकरणातून या विभाचा विकास साधण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानुसार या विभागात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचबरोबर या मतदार संघाचा विकास सुरु ठेवताना तरुणांना जास्तीत जास्त रोजगार मिळावेत यासाठी रोजगार मार्गदर्शन शिबीरे, महिलांसाठी विविध रोजगार वृद्धी प्रशिक्षण शिबीरे राबवली जाणार असल्याचे आ. महेंद्र दळवी यांनी सांगितले.



या कार्यक्रमाला शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख मा.आमदार महेंद्र दळवी, शिवसेना अलिबाग तालुका प्रमुख राजाभाई केणी, उप तालुका प्रमुख प्रकाश पाटील, विभाग प्रमुख योगेश जुईकर, कुर्डूस जिल्हा परिषद मतदार संघाचे संपर्क प्रमुख शैलेंद्र पाटील, कुसुंबळे विभाग उप विभाग प्रमुख महेश वावेकर, अरविंद पाटील, प्रमुख मन्मय पाटील, कुर्डूस विभाग प्रमुख तुषार शरमकर, कुसुंबळे ग्रामपंचायत सदस्य जिवन पाटील, उत्तम शेठ पाटील, कुर्डूस उप विभाग प्रमुख सूर्यकांत केणी, कुर्डूस शाखा प्रमुख कांचन केणी, दिपक पाटील नवखार व विभागातील सर्व शाखा प्रमुख उप शाखा प्रमुख परिसरातील कार्यकर्ते उपस्थित होते.

## युवा नेते केदार भगत यांनी घेतले गौरा गणपतीचे दर्शन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल आणि परिसरातील गौरी गणपतीचे दर्शन भाजपचे युवा नेते केदार भगत यांनी आपल्या मित्रपरिवासमवेत घेतले.

गावदेवी मित्र मंडळ (गावदेवीपाडा), शिवशक्ती मित्र मंडळ (लाईन आळी) जय भवानी मित्र मंडळ (कापड बाजार), सदीच्छा मित्र मंडळ (घाटे अळी) यांच्या सार्वजनिक गणेश मंडळाचे दर्शन घेतले. तसेच लाईन आळी येथील निखिल जाधव यांच्या घरगुती गणेशाचे देखील दर्शन घेतले. यावेळी अभिजित साखरे, सुमित दसवते, नितेश भगत, योगेश साळवी, गौरव सावंत, साहिल मोरे, कपिल कुरघोडे, सनी गायकर, सनी भेंडखळे, सिद्धू मोरे, आकाश भोपतराव आदी उपस्थित होते.



## पनवेल पत्रकार मंचाने केला फार्मासिस्टचा सत्कार

### जागतिक फार्मासिस्ट दिनाच्या औचित्याने केले सन्मानित



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आज २५ सप्टेंबर हा जगभरात जागतिक फार्मासिस्ट दिन म्हणून साजरा केला जातो. रुग्णांना योग्य औषधे देणे, त्यांचे समुपदेशन करणे या कामी हिरीरीने अग्रस्थानी असणारा समाजातील हा घटक महत्वाचा असला तरी बऱ्याचदा दुर्लक्षित राहिला आहे. फार्मासिस्ट मंडळींचे रुग्णसेवेचे कार्याचे प्रती आभार प्रकट करण्याचे उद्देशाने पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या वतीने पनवेल मधील फार्मासिस्ट बांधवांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

पनवेल नगरीच्या जडणघडण प्रक्रियेचे साक्षीदार असणाऱ्या यशवंत मेडिकल, माधव मेडिकल, धन्वंतरी मेडिकल आणि प्रिती मेडिकल यांना गौरविण्यात आले. पत्रकार मंचाचे अध्यक्ष,ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांनी शाल पुष्पगुच्छ आणि सन्मानपत्र देऊन फार्मासिस्ट बांधवांचा सत्कार केला. यशवंत मेडिकलचे यशवंत धारप हे गेली चार दशके अविरत रुग्णसेवा करत आहेत.४० वर्षांच्या प्रवासात औषध समुपदेशनाची अनेक स्थित्यंतरे पाहिलेल्या यशवंत धारप यांचा सपत्निक सत्कार करण्यात आला. पनवेलच्या पहिल्या पाच मेडिकल स्टोअर्स च्या सूचित सन्मानाने विराजमान होणारे अशोक गिल्डा यांचे माधव मेडिकल आजही त्याच निष्ठेने रुग्णसेवा बहाल करत आहे. लायन्स क्लबच्या माध्यमातुन देखील अशोक गिल्डा समाजसेवा देत आहेत. मंचाच्या वतीने माधव मेडिकल च्या गिल्डा यांचा सन्मान करण्यात आला.

फार्मासिस्ट बांधवांच्या अन्याययराष्ट्रीय स्तरावरील संस्थेचे सन्माननीय सदस्य असणाऱ्या संतोष घोडींदे यांचा देखील सन्मान करण्यात आला. औषध विक्री हा व्यवसाय नसून ती एक रुग्णसेवा असल्याच्या उदात्त हेतूने संतोष कार्य करत आहेत. त्यांनी धन्वंतरी मेडिकल मध्ये औषध माहिती केंद्र कार्यान्वित केले आहे. अनेक संस्थांतून कार्यरत असणारे संतोष घोडींदे हे रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल चे सक्रिय सभासद देखील आहेत.

पनवेल येथील सर्वात व्यस्त असणारे मेडिकल स्टोअर म्हणजे प्रिती मेडिकल स्टोअर्स असे म्हटल्यास जराही अतिशयोक्ती होणार नाही. कितीही व्यस्त असले तरीही रुग्णांशी कायम हसतमुखाने आणि नम्र पणे संवाद साधणारे राजू पटेल यांचा देखील यावेळी सन्मान करण्यात आला.ते गेली ३२ वर्षे रुग्णसेवा देत आहेत. जुन्या पोस्टनजिक पटेल मेडिकल च्या माध्यमातून देखील यापूर्वी त्यांनी ९ वर्षे रुग्णसेवा दिलेली आहे.

कार्यक्रमाचे आयोजनाबाबत बोलताना अध्यक्ष माधव पाटील यांनी सांगितले की आजारातून बरे झाल्यावर डॉक्टरांचे आभार मानले जातात परंतु या प्रक्रियेत महत्वाचे असलेल्या फार्मसिस्ट बांधवांचे आभार मानले जात नाहीत. खरे तर प्रत्येक फार्मासिस्टचा सत्कार करायचा आमचा मानस आहे. वेळेअभावी हे शक्य झाले नाही. आज पनवेल ची ओळख म्हणून या मेडिकल स्टोअर्स ना गणले जाते.त्यांच्या रुग्णसेवेला सन्मानित करताना अत्यानंद होत आहे.

फार्मासिस्ट बांधवांच्या सन्मान सोहळ्याला अध्यक्ष माधव पाटील यांच्या समवेत सरचिटणीस मंदार दोंदे, विवेक पाटील, संजय कदम, खजिनदार नितीन कोळी, राजू गाडे, सचिन वायदंडे, सुनील राठोड, चेतन पोपेटा, वैभव लबडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## रविवारी राज्यस्तरीय आणि रायगड जिल्हास्तरीय मायबोली एकपात्री अभिनय स्पर्धेची अंतिम फेरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अखिल भारतीय नाट्य परिषद पनवेल शाखा आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या ’राज्यस्तरीय आणि रायगड जिल्हास्तरीय मायबोली एकपात्री अभिनय स्पर्धेची अंतिम फेरी रविवार दिनांक २६ सप्टेंबरला मार्केट यार्ड मधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात होणार आहे.

या अंतिम फेरीचे उद्घाटन सकाळी ०९ वाजता महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्या हस्ते तर पारितोषिक वितरण आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सायंकाळी ०६ वाजता होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध सिनेनाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, सभागृहनेते परेश ठाकूर तर सन्माननीय उपस्थिती म्हणून अभिनेते प्रभाकर मोरे व भरत साळवे यांची उपस्थिती लाभणार आहे.

अखिल भारतीय नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेचे दुसरे वर्ष आहे. मराठी भाषेत आयोजित करण्यात आलेली हि स्पर्धा दोन फेऱ्यांमध्ये होत असून प्राथमिक फेरी ऑनलाईन पद्धतीने पार पडली. यामध्ये १०० जणांनी सहभाग घेतला होता.

राज्यस्तरीय मायबोली एकपात्री अभिनय स्पर्धेतील प्रथम क्रमांकास १० हजार रुपये, द्वितीय ०७ हजार, तृतीय क्रमांकास ०३ हजार रुपये, उतेजनार्थ एकूण ०२ पारितोषिके तर रायगड जिल्हास्तरीय अभिनय स्पर्धेतील प्रथम क्रमांकास ०५ हजार, द्वितीय ०३ हजार तर तृतीय क्रमांकास ०२ हजार रुपये, उतेजनार्थ एकूण ०२ पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.


## महापालिका कार्यक्षेत्रात रविवारी पल्स पोलिओ मोहिम

### ०-५ वयोगटातील बालकांना होणार पोलिओ लसीकरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात रविवार, दिनांक २६ सप्टेंबरला ०–५ वयोगटातील बालकांसाठी उपराष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिम राबविण्यात येणार आहे.

या मोहिमे अंतर्गत ०–५ वयोगटातील बालकांना सकाळी ९.०० ते ५.०० या वेळेत लसीकरण केले जाणार आहे. या मोहिमेसाठी पोलिओ लसीकरण टिम सज्ज झाली आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील रेल्वे स्टेशन्स, बस स्थानके, सहा नागरी आरोग्य केंद्र, तसेच शहरात ठि क ठि का णी प ा ` लि अ ा ` लसीकरण केंद्र उभारले जाणार आहेत. पनवेल कार्यक्षेत्रात एकुण ३२६ पोलिओ लसीकरण केंद्रावरती बालकांचे लसीकरण केले जाणार आहे. याबरोबरच झोपडपट्टी, बांधकाम क्षेत्रे अशा भागातील बालकांच्या लसीकरणासाठी ४१ मोबाईल टिम कार्यरत असणार आहेत तसेच २४ ट्राझिट टिम असणार आहेत.



पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात पोलिओ लसीकरणासाठी ६६ हजार ५८५ बालकांचे लक्ष असणार आहे. पालकांनी कोविड नियमांचे पालन करून आपल्या बालकांना लसीकरण केंद्रावर जाऊन लसीकरण करून घ्यावे असे आवाहन आयुकत गणेश देशमुख यांनी केले आहे.

## म्हसळयात शिवसेनेला खिंडार, कानसे वाडीतील शिवसेनेचे कार्यकर्ते राष्ट्रवादीत दाखल



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

तालुक्यातील खेडोपाड्यात चाललेल्या विकासावर्ती प्रभावित होऊन घोणसे ग्रामपंचायतीत निवाची वाडी येथील शिवसेनेच्या कार्यकर्त्यासहित ग्रामस्थांनी व ज्यांनी शिवसेनेत असताना सभापती पद घोषविलेल्या कुटुंबाने देखील आमदार अनिकेत तटकरे यांच्या उपस्थितीत व सरपंच तथा राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्षा रेश्मा कानसे, गण अध्यक्ष अनिल बसवत, रमेश कानसे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षात प्रवेश केला.

यावेळी जनार्दन खेडेकर, संदीप खेडेकर, उत्तम महाडिक, संदेश खेडेकर, दीपक खेडेकर यांच्या समवेत अन्य ग्रामस्थांनी प्रवेश केला. तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्था, रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीचे वारे जवळ येवू लागले तशी राजकीय उलथा पालथही सुरु झाली असल्याचे निदर्शनास येत आहे. रायगडचे लोकप्रिय खासदार सुनील तटकरे, महाराष्ट्र राज्यमंत्री तथा रायगड पालकमंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांनी केलेय सर्वांगीण विकास यांच्या वरती प्रभावित होऊन येथील शिवसैनिक त्यांच्या गावातील अंतर्गत रस्ते, मुख्य रस्ता, पाण्याचा प्रश्न, बंधार याचा प्रश्न मार्गी लावणार असल्याचे आमदार अनिकेत तटकरे यांच्या कडून सांगण्यात आले.

घोणसे ग्रामपंचायत अंतर्गत खासदार, पालकमंत्री, आमदार यांच्या माध्यमातून सर्वांगीण विकास करण्यासाठी कोटी रुपयाचा निधी उपलब्ध करून दिलेला आहे. त्या निधीतून ग्रामपंचायती परिसरात सर्व सामान्य जनतेला हवे असणारे विकास कामे आरोग्य विषयक शिबिरे लसीकरण मोहीम राबवून विकास कामाचा छाप दिसल्यामुळेच आज निवाची वाडीने प्रवेश केल्याचे सरपंच तथा राष्ट्रवादी काँग्रेस महिला अध्यक्षा रेश्मा कानसे यांनी सांगितले. यावेळी अजून काही अंतर्गत राहिलेली विकास कामे खासदार, पालकमंत्री, आमदार यांच्या माध्यमातून पूर्ण करण्याचे सांगितले आहे.